# वसई-विरार शहर महानगरपालिका

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

दि.१०/०७/२०२४

**<u>महानगरपालिकेकडून एकल वापर प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने मोठी कारवाई,</u>**

**<u>५२८४ किलो प्रतिबंधित प्लास्टिक साठा जप्त</u>**

महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.१२/०८/२०२१ रोजीचे परिपत्रकानुसार एकल वापर प्लास्टिक वापरावर बंदी असुन प्लास्टिकचे उत्पादक, वापर, विक्री, साठवणुक करण्यास मनाई आहे.

**दि.०९/०७/२०२४ रोजी प्रभाग समिती 'जी' वालीव येथे धाडसत्र घेतले असता गीता इंडस्ट्रियल इस्टेट मधिल बिल्डींग नं. ३ येथील नीळकंठ प्लास्टिक्स या कंपनीवर पातळ प्लास्टिकच्या पिशव्या (प्रतिबंधीत प्लास्टिक) तयार करणेबाबत दंडात्मक कारवाई करण्यात आली. सदर कारवाई दरम्यान १२७ गोण्यांमध्ये ४५७९ किलो व प्लास्टिक पिशव्याचे ४७ रोल (७०५ किलो) असे एकुण ५२८४ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले असून प्रथम गुन्हा केल्याने रू. ५०००/- इतका दंड रोख स्वरूपात वसूल करणेत आला आहे.**

वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत एकल वापर प्लास्टिक बंदी मोहिम राबविण्यात येत असून दि.०१ जूलै २०२२ ते आजतागायत ३५ टन प्लास्टिक जप्त करून १७,०९,३००/- इतका दंड आकारण्यात आला आहे. माहिती, शिक्षण आणि संप्रेषण (IEC) अंतर्गत स्वच्छ भारत अभियान राबविण्यात येत असुन एकल वापर प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करण्यात येते व प्लास्टिक बंदी मोहिम राबविण्यात येत आहे.

सदर कारवाई मनपाचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. सुकदेव दरवेशी व यांचे पथकाने मा. आयुक्त श्री. अनिलकुमार पवार यांचे आदेशानुसार व अति. आयुक्त रमेश मनाळे व उपायुक्त नानासाहेब कामठे यांचे मार्गदर्शनाखाली केली. मनपातर्फे उद्योजक, व्यापारी, वितरक, दुकानदार व वापरकर्ते यांना या प्लास्टिकच्या पिशव्यांमुळे होणारी पर्यावरणाची हानी व पावसाळ्यात गटार, नाले बंद होण्यासारखे दुष्परिणाम यांची जाणीव करून देण्यासाठी वेळोवेळी आवाहन, पथनाट्य, शिबिरे, वार्तालाप, पोस्टर्स, स्टिकर्स,

बॅनर्स, शाळा, कॉलेजांमध्ये, रहिवासी संकुलनामध्ये जनजागृती करणेत येते तरी पर्यावरणाची हानी टाळणेस यापुढे अशा थैल्यांचे उत्पादने करू नये व वापर टाळावा त्याऐवजी कापडी थैल्यांचा वापर करावा. यासाठी बाजारामध्ये जैविक पद्धतीच्या विरघळणाऱ्या थैल्या असतात त्याचा वापर करावा, असे आवाहन आयुक्त मा. श्री. अनिलकुमार पवार यांनी मनपातर्फे करीत आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत जप्त करण्यात आलेले प्लास्टिक रिसायकलिंग करणेकरिता Agency ची नेमणुक करण्यात आली असुन सदर एजन्सीमार्फत प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्या व व उत्पादने विरघळवून त्याचे दाणे तयार करणेत येतील व सदर प्लास्टिकचे दाण्यांचे पुन:श्च प्लास्टिक पिशव्या न तयार करता इतर ठोस उत्पादने तयार करणेबाबत अंतर्भुत करणेत आला आहे. यामुळे पर्यावरणाचे रक्षण करणेस मदत होणार आहे. रिसायकलिंग करण्यात येणार आहे. व जेणेकरून प्लास्टिक पासून पुन्हा पिशव्या तयार न करता त्यापासून इतर साहित्य तयार करण्यात येईल व प्लास्टिकपासून होणारा ऱ्हास टाळता येईल.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**